नि. फौ. ख. क्र.१६४/२०२१ निशाणी ४६

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. ७ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – महादेव श्रीराम पातोंड

वय – ५५ वर्षे, व्यवसाय – पो.हे.कॉ. पोलीस स्टेशन, बोरगांव मंजु

पत्ता – कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्री.के.एस.ताकवाले यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि. २६.०२.२०२१ रोजी मी पोलीस स्टेशन, बाळापुर येथे पो.हे.कॉ. या पदावर कार्यरत होतो. त्या दिवशी माझ्याकडे अप क्र. १३१/२०२१, भा.दं.वि.कलम ३२४, ३२३, ५०४ सहकलम ३४ चा तपास सुपुर्त करण्यात आला. त्यामध्ये मला जबानी रिपोर्ट, प्रथम खबरी अहवाल, केस डायरी आणि वैद्यकीय प्रमाणपत्र असे दस्तावेज प्राप्त झाले. तपासा दरम्यान मी घटनास्थळ ग्राम कान्हेरी गवळी येथे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ कडे जाणाऱ्या रस्त्यावर, खतीबसाहेब यांच्या गायवाडया समोर जावुन दोन पंचांना बोलवुन त्यांच्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. सदर घटनास्थळ पंचानामा पंचांना वाचुन दाखविल्यानंतर त्यांच्या सहया घेतल्या. सदर घटनास्थळ पंचनामा करते वेळी फिर्यादी सोबत होता, त्याने दाखविलेल्या घटनास्थळाचा पंचनामा केला. मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझ्या व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ४७** देण्यात येते.

२. मी साक्षीदारांचे बयान त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. साक्षीदार क्र. ४ श्रीकृष्ण तेलगोटे यांचे बयान मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. त्यांच्या बयानातील अधोरेखांकित भाग अ बरोबर असुन त्यास **नि.क्र. ४८** देण्यात येते. साक्षीदार क्र. ५ सुभाष तेलगोटे यांचे बयान मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. त्यांच्या बयानातील अधोरेखांकित भाग अ बरोबर असुन त्यास **नि.क्र. ४९** देण्यात येते. त्यानंतर तिनही आरोपींना अटक करुन समजपत्रावर सोडले. आरोपी प्रमोद फुरंगे कडुन पंचां समक्ष एक लाकडी काठी जप्त करण्यात आली. मला सदर जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझ्या व पंचांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ५०**

देण्यात येते. आरोपीकडुन जप्त केलेली काठी पाहिल्यास ओळखु शकेल. मला सदर काठी दाखविण्यात आली, ती तीच असुन त्यास **वस्तु नि.अ.** देण्यात आलेली आहे. तपासा दरम्यान आरोपी विरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकेल, दोन आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एस.टी.इंगळे यांचे मार्फत</u>

३. मी तपासा दरम्यान फिर्यादीचा जबानी रिपोर्ट वाचला होता. दि. २४.०२.२०२१ रोजी फिर्यादी गावातील बाजारात कोणत्या भाजीपाला विक्रेत्याकडे गेला होता त्याची चौकशी मी केली नाही. मी त्याची चौकशी केली असती तर दि. २४.०२.२०२१ रोजी फिर्यादी भाजीपाला विक्रेत्याकडे गेला होता त्याची माहिती मिळाली असती. फिर्यादीने तपासा दरम्यान तो कोणत्या भाजीपाला विक्रेताकडे गेला त्याबद्दल मला सांगितले नाही. पंचानाम्यासाठी हजर राहणेकरीता पंचांना तारीख आणि वेळसह नोटीस द्यावी लागते. तशी नोटीस मी पंचांना दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा फिर्यादीच्या घरी बसुन तयार केला. घटनास्थळ जवळील गायवाडा खतीब साहेबांचा आहे किंवा कसे त्याबद्दल मी ग्रामपंचायतकडे चौकशी केली नाही.

प्रश्न – सदर गायवाडा खतीब साहेबांचा असे तुम्ही तुमच्या मनाने लिहिले ?

उत्तर – घटनास्थळ जवळील गायवाडा खतीब साहेबांचा आहे असे मला पंचांनी सांगितले होते.

४. फिर्यादी शेषराव धोटेचे बयान मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. सदर बयान मी त्यांना वाचुन दाखविले होते. मला तिन्ही आरोपींनी शिवीगाळ केली असे फिर्यादीने मला त्याचे बयान देतांना सांगितले नव्हते. मारहाणीमुळे माझे संपुर्ण शरीर सुजले होते असे फिर्यादीने मला त्याचे बयान देतांना सांगितले नव्हते.

५. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार क्र. ४ श्रीकृष्ण तेलगोटे आणि साक्षीदार क्र. सुभाष तेलगोटे यांचे बयान दोषारोपपत्र तयार करण्याच्या हेतुने माझ्या सोईनुसार नोंदवुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी चौकशी दरम्यान साक्षीदारांचे बयान न घेता माझ्या मनाने बयान नोंदवुन घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी जप्ती पंचनाम्यामध्ये नमुद

कोणतीही वस्तु जप्त केली नाही, मी फिर्यादीच्या घरी बसुन जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे आहे की, जप्ती पंचनाम्यासाठी हजर राहणेकरीता मी पंचांना नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी योग्य तपास न करता आरोपीविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.11.19 17:30:05 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. १९/११/२०२५